सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनेश्रद्धा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## केंद्रीय अर्थसंकल्प सादर; कॅन्सरची औषधी, सौर पॅनल, सीएनजी, कपडे स्वस्त

# जीएसटी सोपं बनवणं अन् रोजगाराच्या संधी वाढवणं हे उद्दिष्ट - निर्मला सितारमण

# शेअर बाजारात घसरण; सोने चांदीचे दरात घसरण

**नवी दिल्ली -** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज (१ फेब्रुवारी २०२६) देशाचा अर्थसंकल्प ( २०२६) मांडला. निर्मला सीतारमण ( ) यांनी सलग नवव्यांदा अर्थसंकल्प ( २०२६) सादर केला. आम्ही देशातील गरिबी निर्मूलनासाठी महत्वाचे काम केले. देश गेल्या १२ वर्षांपासून प्रगतीपथावर आहे. देशात गुंतवणुक वाढीला लागली आहे. भारताची विकसीत भारताकडे वाटचाल सुरू राहील. जीएसटी सोप बनवणं आणि रोजगाराच्या संधी वाढवणं हे आमचं उद्दिष्ट आहे, असं निर्मला सीतारमण यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात काय स्वस्त आणि काय महाग झालंय,

**२०२६-२७ च्या अर्थसंकल्पातून काय स्वस्त झालं?**

कॅन्सरची औषधं, मधुमेहाची औषधं, कपडे, चामड्याची बूटं, क्रीडा साहित्य, मोबाईल फोन, ईव्ही बॅटरी, सौर पॅनेल, सीएनजी, वैद्यकीय उपकरणे, एलसीडी, एलईडी, भारतात बनवलेले कपडे, ईव्ही वाहने, मोटारसायकल, फ्रोझन मासे,

ईव्ही लिथियम बॅटरी, वैद्यकीय उपकरणे, लिथियम आयन बॅटरी, अपघात विमा.

**२०२६-२७ च्या अर्थसंकल्पातून काय महाग झालं?**

इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले, खनिज, दारु, पीव्हीसी फ्लेक्स शीट्स

**निर्मला सीतारमण यांच्या मोठ्या घोषणा**

राष्ट्रीय हातमाग धोरण कारागिरांना प्रोत्साहन आणि समर्थन प्रदान करेल. शैक्षणिक संस्थांकडून तांत्रिक सहाय्य शक्य होईल. मेगा टेक्सटाइल पार्क स्थापन केले जातील.

महात्मा गांधी ग्राम स्वराज - खादीला प्रोत्साहन देण्यासाठी - उत्पादन, प्रशिक्षण आणि विपणनासाठी असेल.

एक जिल्हा, एक उत्पादन याला प्रोत्साहन दिले जाईल.

क्रीडा - उपकरणे डिझाइन आणि उत्पादन करण्याची योजना आहे.

औद्योगिक समूह - पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान सुधारण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली आहे.

एमएसएमईसाठी - सूक्ष्म उद्योगांना मदत करण्यासाठी स्वावलंबी भारत निधी तयार केला जाईल.

सरकारी संस्थांना अल्पकालीन मॉड्यूलर अभ्यासक्रम डिझाइन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टियर २ आणि ३ स्तरांपर्यंत प्रशिक्षण दिले जाईल. मालवाहतुकीसाठी मालवाहतूक कॉरिडॉर बांधले जातील

५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर-२ आणि ३ शहरांच्या विकासासाठी ११.२ लाख कोटींचे वाटप करण्यात आले आहे. २०२६-२७ मध्ये ही रक्कम १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवली जाईल.


खासगी विकासकांसाठी पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी तयार करण्यात आला आहे. सरकार अंशतः हमी देईल.

## आकड्यांची चमक, वास्तवाची अंधारी छाया- खा. काळे



महाराष्ट्रासारख्या मोठ्या योगदान देणाऱ्या राज्याकडे दुर्लक्ष आकडे समृद्धी दाखवतात, पण जनतेला रोजगार व दिलासा नाही रोजगाराचा उल्लेख आहे, पण ठोस रोजगार धोरण नाही रेल्वे, शहरे, हवामान बदल यावर फक्त घोषणा, दिशा नाही महिला, शेतकरी, युवक, गरीब या घटकांसाठी विशेष तरतुदी गायब बँकिंग, वित्तीय क्षेत्रावर मौन आणि समित्यांवरच भर रुपयाची घसरण व गुंतवणुकीचा अभाव यावरही दुर्लक्ष हा अर्थसंकल्प मथळ्यांसाठी भव्य, पण सामान्य जनतेसाठी निराशाजनक असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी म्हटले आहे.

## विकसित भारताकडे दमदार पाऊल टाकणारा हा अर्थसंकल्प - भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे





**जालना -** शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक, शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. प्रत्येक ग्रोथ हबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, त्याचा लाभ महाराष्ट्रातील सर्व प्रमुख शहरासाठी वाढीसाठी होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज (१ फेब्रुवारी २०२६) देशाचा अर्थसंकल्प सादर करत विकास, उद्योग आणि आत्मनिर्भरतेवर भर दिला. या बजेटमध्ये दुर्मिळ खनिज उत्खनन, औषधनिर्मिती व बायोफार्मा क्षेत्राला चालना, सेमीकंडक्टरसाठी मोठी तरतूद, तसेच केमिकल पार्क आणि पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

कॅन्सर (कर्करोग) आणि मधुमेहाची () औषधे स्वस्त करण्याची मोठी घोषणा करण्यात आली आहे. या जीवनरक्षक औषधांवरील कर कमी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. ज्यामुळे सामान्य नागरीकांना यांचा खुप उपयोग होणार आहे, असे मत भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी व्यक्त केले.

मालवाहतुकीसाठी एक समर्पित फ्रेट कॉरिडॉर बांधला जाईल. पूर्वेकडील दानकुनी ते पश्चिमेकडील सुरत या बंदराला जोडण्याची योजना देखील आहे. वाराणसी आणि पटना विकसित करून अंतर्गत जलमार्ग विकसित केले जातील.

७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.

देशातील सीप्लेन उत्पादकांना पाठिंबा दिला जाईल. मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई आणि सिलिगुडी ते वाराणसी यासह सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.

विकसित भारतासाठी एक उच्चस्तरीय बँकिंग समिती स्थापन केली जाईल.

अर्थसंकल्पानंतर, आज (१ फेब्रुवारी) शेअर बाजार घसरणीसह बंद झाला. सेन्सेक्स १,५४६ अंकांनी किंवा जवळपास २ टक्क्यांनी घसरून ८०,७२२ वर बंद झाला. निफ्टी देखील ४९५ अंकांनी घसरून २४,८२५ वर बंद झाला. अर्थसंकल्पात फ्युचर्सवरील सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (एसटीटी) 0.0२ वरून 0.0५ टक्क्यांपर्यंत वाढवला. ऑप्शन्स प्रीमियम आणि एक्सरसाइज ऑप्शन्सवरील एसटीटी देखील 0.१५ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. बाजारात ही घसरण होण्याचे कारण हेच आहे. गेल्या सात वर्षांतील अर्थसंकल्पाच्या दिवशी ही सर्वात मोठी घसरण आहे. यापूर्वी, २0२0-२१ मध्ये अर्थसंकल्पाच्या दिवशी सेन्सेक्स ९८७ अंकांनी आणि निफ्टी ३00 अंकांनी खाली बंद झाला.

सार्वजनिक क्षेत्रातील बँक क्षेत्रात सर्वात मोठी घसरण

सेन्सेक्सच्या ३0 समभागांपैकी आज २७ समभाग घसरले, तर फक्त तीन समभाग वाढले. , आणि अदानी पोर्ट्सचे शेअर्स ६ टक्क्यांपर्यंत घसरले. सार्वजनिक क्षेत्रातील बँक क्षेत्रात सर्वात मोठी घसरण झाली, ६ टक्क्यांपर्यंत घसरली. धातू, मीडिया, , मीडिया, फार्मा, वित्तीय सेवा आणि रिअल्टी क्षेत्रांमध्येही घसरण झाली.

अर्थसंकल्पाच्या दिवशी बाजारातील हालचाल

अर्थसंकल्पीय भाषणानंतर: व्यवहारादरम्यान, सेन्सेक्स २३७0 अंकांनी घसरून ७९८९९ या दिवसाच्या नीचांकी पातळीवर पोहोचला. निफ्टी देखील ७५0 अंकांनी घसरून २४,५७१ च्या नीचांकी पातळीवर पोहोचला.

अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान: सेन्सेक्स १६00 अंकांनी किंवा २ टक्क्यांनी घसरून ८0६00 वर पोहोचला. निफ्टी देखील सुमारे ५५0 अंकांनी घसरून २४,८00 वर पोहोचला.

अर्थसंकल्पीय भाषणापूर्वी: सकाळी ९:१५ वाजता, सेन्सेक्स १00 अंकांनी घसरून ८२,१५६ वर उघडला. निफ्टी देखील सुमारे ५0 अंकांनी घसरून २५,२७५ वर उघडला. म्हणजे काय?

, किंवा सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स, हा शेअर बाजारातील प्रत्येक खरेदी किंवा विक्रीवर आकारला जाणारा थेट कर आहे. तुम्हाला तोटा झाला तरीही तुम्हाला हा कर भरावा लागतो. तो तुमच्या व्यवहार मूल्यातून थेट वजा केला जातो आणि स्टॉक एक्सचेंजद्वारे सरकारकडे जमा केला जातो. वाढलेल्या कर दरांमुळे, आता तुम्हाला एका व्यवहारासाठी पूर्वीपेक्षा जास्त पैसे द्यावे लागतील.

ऑप्शन प्रीमियम आणि एक्सरसाइजवरील कर देखील वाढले

ऑप्शन प्रीमियमवरील कर: जेव्हा तुम्ही एखादा ऑप्शन खरेदी किंवा विक्री करता तेव्हा तुम्ही भरलेल्या किंमतीवरील (प्रीमियम) कर आता वाढला आहे.

ऑप्शन एक्सरसाइजवरील कर: ऑप्शन कॉन्ट्रॅक्टचा वापर केल्यानंतर डिलिव्हरी घेण्यावर किंवा देण्यावर कर देखील वाढवण्यात आला आहे.

गुंतवणूकदारांवर त्याचा काय परिणाम होईल?

व्यापार अधिक महाग होईल: एसटीटीमध्ये वाढ केल्याने पर्यायांमध्ये व्यापार थोडा महाग होईल, कारण तुम्हाला सरकारला पूर्वीपेक्षा जास्त कर भरावा लागेल.

नफ्यावर परिणाम: करात वाढ केल्याने तुमचा निव्वळ नफा किंचित कमी होईल आणि जर तुम्हाला तोटा झाला तर तो करामुळे थोडा वाढेल.

**सोने चांदी दरात घसरण**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज देशाचा अर्थसंकल्प सादर केला. निर्मला सीतारमण यांनी नवव्यांदा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात सोने आणि चांदीवरील आयात शुल्क कमी केलं जाईल किंवा सोने चांदीवरील जीएसटी कमी केला जाईल, अशी अपेक्षा सोने ग्राहकांना आणि सराफांना होती. मात्र, पान २ वर

## अर्थसंकल्प २०२६ देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने चालना देणारा - आमदार अर्जुनराव खोतकर



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा देशाच्या आर्थिक बळकटीकरणासाठी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला तसेच मध्यमवर्गीय घटकांच्या हिताचा संतुलित आणि दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प आहे. पायाभूत सुविधा, रोजगारनिर्मिती, कृषी क्षेत्र, आरोग्य व शिक्षण यांना प्राधान्य देत भारताला स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने हा अर्थसंकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शेतकऱ्यांसाठी वाढविण्यात आलेली तरतूद, कृषी पूरक उद्योगांना मिळणारे प्रोत्साहन, ग्रामीण भागातील विकासासाठी करण्यात आलेल्या योजना तसेच लघु व मध्यम उद्योगांना दिलेले आर्थिक बळ यामुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीला गती मिळणार आहे. युवकांसाठी कौशल्य विकास, अनुकूल धोरणे आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या तरतुदी या स्वागतार्ह आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा हा अर्थसंकल्प साजेसा असून विकसित भारताच्या दिशेने टाकलेले हे भक्कम पाऊल आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी हा अर्थसंकल्प निश्चितच उपयुक्त ठरेल.

## सर्वसामान्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारे - शेख इब्राहिम



जालना केंद्र सरकारने सादर केलेले देशाचे बजेट हे सर्वसामान्य व गरीब जनतेच्या अपेक्षांवर पाणी फेरणारे असून, केवळ तोंडाला पाने पुसणारे बजेट असल्याची तीव्र प्रतिक्रिया जालना काँग्रेस सेवादलचे जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम यांनी व्यक्त केली आहे. महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांची कर्जबाजारी स्थिती आणि गरिबांची दैनंदिन झगडाच या बजेटमध्ये पूर्णपणे दुर्लक्षित करण्यात आला असल्याचे शेख इब्राहिम म्हणाले. ''या बजेटमध्ये मोठ्या उद्योगपतींसाठी सवलती आहेत, मात्र गरीब, शेतकरी, कामगार, युवक आणि महिलांसाठी ठोस तरतूद दिसून येत नाही,'' अशी टीका त्यांनी केली. गॅस दरवाढ, जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती आणि बेरोजगारीवर उपाययोजना न करता केवळ आकडेवारीच्या खेळातून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. ''हे बजेट म्हणजे गरीब जनतेला दिलासा देण्याऐवजी फक्त आश्वासनांची पोकळी आहे,'' असे शेख इब्राहिम म्हणाले. काँग्रेस सेवादल जालना तर्फे या बजेटचा निषेध करण्यात येत असून, गरीब व वंचित घटकांच्या हक्कांसाठी संघर्ष सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

# विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल बघण्याचा स्क्रीन टाईम ठरवावा जास्त वेळ मोबाईल वापर धोकादायक - शिल्पा कहोणा

**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल बघण्याचा स्क्रीन टाईम ठरवावा ६ तासापेक्षा जास्त मोबाईलचा वापर करू नये, मेंदूवर ताण येऊन मानसिक स्वास्थ खराब होऊ शकते. असे प्रतिपादन संगणक व्यवस्थापन विभागाच्या प्रा.शिल्पा कहोना यांनी केले.

जेइएस महाविद्यालय जालनाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मांडवा येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दि. २९ जानेवारी ते४फेब्रुवारी२०२६ दरम्यान विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. तिसऱ्या दिवशी बौद्धिक क्षेत्रात स्क्रीन टाईम टू ग्रीन टाईम या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्रा खलिफा होते. यावेळी व्यासपीठावर प्रा. समाधान पवार प्राध्यापक संतोष नजण त्यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा. शिल्पा कहोणा म्हणाल्या की , मोबाईल वापरण्याचा सहा तासापेक्षा जास्त वेळ मोबाईल बघू नये नाहीतर मानसिक स्वास्थ खराब होते मेंदू काम करू शकत नाही त्यावर ताण पडतो यामुळे भारतात मानसिक रुग्णांची संख्या वाढलेली आहे. युवकांनी याचा गांभीर्याने विचार करावा यामुळे युवा पिढी चे भविष्य बरबाद होऊ शकते असेही प्रा. कहोना यांनी सांगितले.

यावेळी छत्रपती संभाजी नगर, राष्ट्रीय सेवा योजनेचे





विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेश सरकटे प्रा. किशोर तापडिया प्रा. योगेश लहामाटे आदि उपस्थित होते या कार्यक्रमचे सूत्रसंचालन दिपाली दिवेकर यांनी केले. तर आभार नक्षत्रा तांदळे यांनी मानले.

# श्रमदानाला जीवनामध्ये अत्यंत महत्त्व - परमपूज्य माधवगिरी महाराज

## जपानुष्ठान सोहळ्याची सांगता; भाविकांना पुरणपोळीचा महाप्रसाद



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** येथून जवळच असलेल्या गोंधनखेडा (ता. जाफराबाद) येथील संत जनार्दन स्वामी स्मृती मंदिर गौरीशंकर महादेव मंदिर परिसरात सुरू असलेल्या भव्य जपानुष्ठान सोहळ्याची सांगता शुक्रवारी (ता.३0) उत्साहात झाली. स्वामी माधवगिरी महाराज यांच्या प्रवचनाने सात दिवस मौन धारण करून बसलेल्या जप अनुष्ठाणार्थींचे मौन सोडविण्यात आले. यानिमित्ताने मागील सात दिवसापासून आयोजित धार्मिक सोहळ्यांमध्ये सांगता समारंभाला माधवगिरी महाराज यांच्यासह महेश गिरी महाराज, राघव गिरी महाराज ज्ञानेश्वर माऊली जवखेडा यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. सोहळ्याचे प्रस्ताविक पान २ वर

## संपादकीय पान

# विमान दुर्घटना चिंताजनक

२८ जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाला झालेल्या भीषण अपघातात त्यांचे दुर्दैवी निधन झाले. अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले. त्यांच्यासारखा विकासाची दृष्टी असलेला नेता विमान अपघाताने हिरावून घेतल्याने महाराष्ट्र काही वर्ष मागे गेला. त्यांचे निधन ही महाराष्ट्रासाठी मोठी हानी आहे. अर्थात विमान अपघातात मृत्यू झालेले अजितदादा हे पहि असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे. हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजारांहून अधिक लहानमोठे विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. आपल्या देशातही विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमवावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. काँग्रेस नेते संजय गांधी, माजी केंद्रीय मंत्री माधवराव सिंधिया, लोकसभेचे तत्कालीन अध्यक्ष आणि तेलगु देसमचे नेते जी एम सी बालयोगी, मेघालयाचे ग्रामीण विकास मंत्री सायप्रियम संगमा, हरियाणाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश जिंदाल, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी, गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. त्यात आता अजितदादा पवार यांच्या नावाचीही भर पडली आहे. चार वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# अलंकार चौकाजवळ 'हाय स्टाईल रेडिमेट जीन्स' दुकानाला भीषण आग

## अंदाजे १६ ते १७ लाखांचे नुकसान



**जालना । प्रतिनिधी -** सकाळी ९ वा. च्या सुमारास मिळालेल्या माहीतीनुसार जालना शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या अलंकार चौकाजवळील ' जीन्स' या रेडीमेड कपड्यांच्या दुकानाला शनिवारी रात्री उशिरा भीषण आग लागून अंदाजे १६ ते १७ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे.

दुकानाचे मालक अमान खान यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते मागील सात वर्षापासून दुकान चालवित आहेत. शनावारी रात्री पावणे दहाच्या सुमारास दुकान व्यवस्थित बंद करून ते घरी गेले होते. मात्र सव्वा दहाच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर फोन येऊन दुकानाला आग लागल्याची माहिती मिळाली. तात्काळ घटनास्थळी पोहोचून शटर उघडले असता दुकानाच्या मागील बाजूस भीषण आग लागलेली दिसून आली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. यावेळी अग्निशमन अधिकारी माधव पानपट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक अधिकारी संदीप दराडे वाहन चालक पंजाबराव देशमुख नागेश घुगे शरद भांदुर्गे जॉन गवळे किशोर सकट यांनी परिश्रम घेतले.

तसेच सदर बाजार पोलीस कदीम जालना ठाण्याचे कर्मचारीही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सुमारे एका तासाच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. मात्र तोपर्यंत दुकानातील १० ते १२ लाख रुपयांचे रेडीमेड कपडे आणि पाच ते साहा लाख रुपयांचे फर्निचर जळून खाक झाले.

आग विझवण्यासाठी परिसरातील नागरिकांनीही मोठी मदत केली. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करून आगीचे कारण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी माहितीही दुकान मालक अमान खान यांनी दिली आहे.

# नृशंस उमेश कोल्हे हत्या प्रकरणः मुख्य आरोपीचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला

समाजाच्या विवेकाला धक्का देणारा आणि समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणारा हा गुन्हा अत्यंत घृणास्पद आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी फार्मासिस्ट उमेश कोल्हे यांच्या २०२२ मधील क्रूर हत्या प्रकरणातील एका मुख्य आरोपीचा जामीन अर्ज फेटाळला. भारतीय जनता पक्षाच्या माजी प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी प्रेषित मोहम्मद यांच्या विरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचे समर्थन केल्याच्या कारणावरून मुस्लिम पुरुषांच्या एका गटाने ही हत्या केली होती. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने पशुवैद्यकीय डॉक्टर असलेल्या युसूफ खान याला जामीन देण्यास नकार दिला. खान याने कोल्हे यांच्या विरोधात एक प्रक्षोभक पोस्ट प्रसारित करून त्यांना धडा शिकवण्याचे आवाहन केले होते. फिर्यादी पक्षाच्या म्हणण्यानुसार, खानने कोल्हे यांच्या पोस्टचा स्क्रीनशॉट घेऊन तो स्वतःच्या मतांसह प्रसारित केला होता, ज्यात लिहिले होतेः ''अमित मेडिकल प्रभात टॉकीजच्या समोर आहे, ज्यांच्या जीवावर कमाई केली त्यांच्याशीच दुश्मनीचा अंजाम काय होतो हे याला सांगायचं आहे, हा मेसेज जास्तीत जास्त ग्रुप आणि गोऱ्या वाल्यांना पाठवा.''

उच्च न्यायालयाने आपल्या २१ पानी निकालात नमूद केले की, खानने आपली प्रक्षोभक पोस्ट प्रसारित केल्यानंतर लगेचच एका सहआरोपीची भेट घेतली, ज्याने ती पोस्ट पुढे इतर आरोपींना पाठवली आणि षडयंत्राच्या बैठका घेतल्या. त्यापैकी एका बैठकीत शर्मा यांच्या वक्तव्याचे समर्थन केल्याबद्दल कोल्हे यांचा शिरच्छेद करण्याचा निर्णय घेण्यात आला. न्यायालयाने म्हटले की, ''रेकॉर्डवरील सामग्री पाहता, प्रथमदर्शनी असे दिसते की, आरोपींनी एका दहशतवादी टोळीची स्थापना केली होती, ज्याचा उद्देश मृताने त्यांच्या श्रद्धेचा केलेला कथित अपमानचा बदला घेणे आणि सर्वसामान्यांच्या मनात दहशत निर्माण करणे हा होता.''

न्यायालयाने खानचा हा युक्तिवाद फेटाळून लावला की, तो कटाच्या बैठकांचा भाग नव्हता आणि त्याला हत्येच्या कटाची माहिती नव्हती. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, ''प्रक्षोभक संदेशाने आग लावल्यानंतर, आरोपीने खुनाच्या कृत्यापर्यंत हुशारीने स्वतःला सहआरोपींपासून दूर ठेवले, जेणेकरून त्याला गुन्ह्यासाठी जबाबदार धरता येणार नाही. त्याच्या आणि एका सहआरोपीमधील २५ फोन कॉल्स हेच दर्शवतात. याचा अर्थ, आरोपी पडद्याआड शांतपणे सक्रिय होता.'' या सर्व परिस्थितीवरून आरोपी आणि इतर आरोपींमध्ये मृताला ठार मारण्याचा गुन्हेगारी कट रचण्यासाठी एकमत झाले होते, जे त्यांनी अंमलात आणले, असे मत न्यायालयाने व्यक्त केले आणि खानचा जामीन अर्ज फेटाळला.

# संत रविदास महाराज यांना अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार तुषार निकम, दिपाली वानखेडे, सुनिल काळूंके यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

# जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध

**जालना । प्रतिनिधी -** जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा इयत्ता नववी व अकरावीसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे. परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी निवड चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र जारी करण्यात आले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज सादर केले आहेत, ते आता ://../२०२५ या अधिकृत संकेतस्थळावरून आपले प्रवेशपत्र प्राप्त करू शकतात. तरी परीक्षेसाठी अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शिक्षक व मुख्याध्यापकांनी याची नोंद घ्यावी. तरी उमेदवारांना जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या दिवशी कोणत्याही अडचणी येऊ नयेत यासाठी प्रवेशपत्रावर दिलेल्या परीक्षा केंद्राचे ठिकाण, वेळेची माहिती आणि सर्व सूचना काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करावे, असे आवाहन अंबा-परतूर जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.जी. पवार यांनी केले आहे.

# महिलांनो, सख्ख्या भावंडांमध्ये वाद नका लावू...

लग्न होण्याच्या आधी सख्ख्या भावंडांमध्ये प्रेम ओसंडून वाहायचे. प्रत्येक भाऊ आपल्या भावासाठी जीव ओवाळून टाकायला सज्ज व्हायचा. एका भावावर संकट आले तर दुसरा भाऊ त्याच्या मदतीसाठी उभा राहायचा. एकत्र कुटुंब पद्धती त्याकाळी अस्तित्वात होती. म्हणून तेव्हाची माणसे माणसात होती. एखादा भाऊ नोकरीला लागला तर दुसऱ्या भावांना आनंदी आनंद व्हायचा. आपल्या भावाची सुखद बातमी घेऊन दुसरा भाऊ गावभर पेढे वाटायचा. आपल्या भावावर कोणतेही संकट येऊ, दुसरा भाऊ त्या संकटाचा सामना करण्यासाठी आपल्या भावाला मदत करायचा. परंतु आता जमाना फार बदलून गेला आहे. एकदा सख्ख्या भावंडांचे लग्न झाले आणि त्यांच्या बायका घरामध्ये नांदायला आल्या की, लगेच काही दिवसांनी त्यांच्या बायका त्यांना चुगल्या लावून व आपल्या पतीला आई-वडिलांबद्दल व त्याच्या भावंडांबद्दल एकाचे दोन काहीही लावून त्यांच्यापासून अलिप्त राहण्यासाठी आपल्या पतीचे कान भरतात. लग्न झाल्यावर प्रत्येक मुलगा बायकोचा बैल बनून जीवन जगत असतो. आई-वडिलांच्या, भावंडांच्या आणि नातेवाईकांच्या विरोधात प्रत्येक स्त्री आपल्या नवरोबाचे कान टोचून त्यांच्यापासून अलिप्त जीवन जगण्यासाठी प्रेरित करते. प्रत्येक भाऊ आपल्या भावंडांपासून अलिप्त राहू लागल्यामुळे एकत्र कुटुंब पद्धतीचा सत्यानाश होऊन गेला आहे. आजकाल प्रत्येक घरात मुलगी नांदायला आली की, थोड्या दिवसांनी घराचा खेळ खंडोबा झाला म्हणून समजा. आजकालच्या मुली सुसंस्कारी नसून भांडकुदळ व चारित्र्यहीन निपजल्यामुळे प्रत्येक घरात नवविवाहित स्त्रियांचे भांडण तंटे दररोज होत आहेत. आजकालच्या मुलींना आई वडील सुसंस्कारी व आपल्या शिलाला प्राणपणाने जपण्यास सांगत नाहीत. उलट आपल्या पतीला, पतीच्या भावाला, सासू-सासऱ्यांना नजुमानता त्यांच्याशी उद्धट वागण्यास व त्यांचा सन्मान करण्यास न सांगता त्यांच्याशी गैरवर्तन करून बाजूला राहण्याचे पाहतात. हल्ली प्रत्येकाकडे मोबाईल आल्यामुळे या मोबाईलच्या जमान्यात प्रत्येक मुलीकडे मोबाईल आहे आणि मुलीच्या आईकडे देखील मोबाईल आहे. मुलगी सासूच्या चुगल्या आपल्या आईजवळ करते आणि आई देखील सासू सोबत भांडण करण्यासाठी आपल्या मुलीमध्ये हिंमत पेरते. मुली देखील आपल्या आई-वडिलांचे ऐकून सासू-सासऱ्याला, पतीला आणि भावजईला अमंगळ शब्दात बोलून त्यांची मान हानी करतात आणि आपल्या पतीला एकाचे दोन लावून देऊन पतीचे पतीच्या आई-वडिलांसोबत व बहिण भावासोबत भांडण तंटे लावून मजा बघतात. मित्रांनो जोपर्यंत भावांचे लग्न होत नाहीत तोपर्यंतच भाऊ आपले असतात. आपल्याला जीव लावतात, आपल्या सुखदुःखात खंबीरपणे साथ देतात आणि आपल्याला आर्थिक संकटात मदत करतात. एकदा बाई घरात आली की, मग मात्र घरात दररोज धूसफूस व कलह सुरू असतात. आजकालच्या मुलींना पूर्ण कुटुंबाला भाकरी घालने नको वाटत आहे. हम दो हमारे दो याप्रमाणे आजकालच्या स्त्रियांना जीवन जगावे वाटत आहे. म्हणतात ना महिला आपल्या नसतात परंतु भाऊ आपले असतात. मान्य आहे भाऊ आपले असतात, पण बायको आली की, भाऊ देखील परके होतात. आजकाल प्रत्येक घरात एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात राहिली नाही. एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात असणारे घर आपल्याला क्वचित पाहायला मिळेल. आजकाल भावात भाऊ नसण्याचे कारण म्हणजे आजकालच्या महिला आहेत. महिलांना घरातील कामकाज करायला कंटाळा येऊ लागला, शेतीतील कामे नको वाटू लागली की मग मात्र महिला आपल्या पती जवळ जाऊन पतीच्या मनात सासू-सासऱ्याबद्दल व दिरांबद्दल कान फुकतात आणि असा मंत्र टाकतात की, नंतर आयुष्यभर भाऊ-भावात राहत नाही. मुलगा बायकोच्या ऐकून आई-वडिलांना मारहाण करतो. भावासोबत वादविवाद करतो. आजकालच्या मुलींना सासू-सासरे बोज वाटत आहेत. बायकोचे ऐकून आई वडिलांना घराबाहेर काढणारे व त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवणारे महाभाग सध्या देशात खूप वाढले आहेत. पत्नीचे ऐकून आई-वडिलांना घराबाहेर काढणे, भावासोबत वाद-विवाद लावून देणे आणि त्यांच्यापासून अलिप्त जीवन जगण्यास आजकालच्या मुली आपल्या नवऱ्याला भाग पाडत आहेत. लग्न झाले की पत्नी आपल्या पतीला लगेच बाजूला राहा, शेती नावावर करून घ्या, आपल्या संपत्तीचा डोलारा वाटून घेण्यास भाग पाडतात. एखादा भाऊ शहरी भागात आपल्या भावाकडे कामानिमित्त गेला तर आजकालच्या मुलींना आपल्या दिराला जेवण खाऊ घालणे नको वाटत आहे. भाऊ असून देखील त्याला मेसचे जेवण जेवावे लागत असते. ही खूप मोठी चिंताजनक बाब आहे. काही मुली लग्न झाल्यावर लगेच आपल्या पतीला घराची व शेतीची वाटणी करून अलिप्त राहण्यास सांगत असते. शेतीच्या व घराच्या वाटणीवरून सख्ख्या भावंडांमध्ये किती वाद विवाद होतात ते आपण पाहिले असेल. आजकाल भावंडांमध्ये नसणारा प्रेम व जिव्हाळा आणि त्यांच्यामध्ये असणारी दया व माया लुप्त झाली आहे. याला कारणीभूत आजकालच्या महिला आहेत. पत्नीचे ऐकून कित्येक पुरुष आपल्या भावाला व आई-वडिलांना बोलायला तयार नाहीत. या सगळ्या गोष्टीला कारणीभूत महिला असल्यामुळे असे विनाशकारी खेळ घडत आहेत. आजकालच्या मुलींवर संस्काराची रुजवून योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे आजकालच्या मुली नाकात वारे शिरल्यासारख्या वागत आहेत. एकेकाळी मुली जेवढा आपल्या आई-वडिलांना जीव लावायच्या तेवढा जीव आपल्या सासू-सासऱ्यांवर देखील लावायच्या. परंतु आजकाल मुलींवर ज्या त्या वयात योग्य संस्कार झाले नाहीत म्हणून हल्ली मुली कसेही अमानुष वर्तन करून आपल्या पतीचे आई-वडिलांसोबत व भावंडांसोबत भांडण लावून मनसोक्त ते लागलेले भांडण पाहत असतात. तेव्हा समस्त महिलांना माझे सांगणे आहे की, मुलींनो सासर घरी गेल्यावर सासू-सासऱ्यांना व दिरांना आपल्या आई वडिलांसारखे व भावांसारखे समजून त्यांना खूप खूप जीव लावा...विभक्त कुटुंब पद्धतीत राहण्यापेक्षा एकत्र कुटुंब पद्धतीत जीवन जगा...विनाकारण सख्या भावंडांमध्ये वाद-विवाद लावून मनसोक्त बघण्यापेक्षा एकीने, प्रेमाने व आपुलकीने मिळून मिसळून राहून गुण्या गोविंदाने हसत खेळत व मजा करत जीवन जगा... विभक्त कुटुंब पद्धतीपेक्षा एकत्र कुटुंब पद्धतीत जो आनंद असतो, तो आनंद पृथ्वीतलावर कुठेही शोधून सापडणार नाही...एवढे लक्षात घ्या...

**-बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

पान १ वरुन

## शेअर बाजारात ...

सोने आणि चांदी संदर्भात कोणताच निर्णय केंद्रीय अर्थसंकल्पात न घेतल्यानं सोने आणि चांदीचे दर असेच कायम राहतील असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

केंद्रीय अर्थ संकल्पात सोने चांदी विषयक कोणतीही घोषणा करण्यात आली नसल्याने,त्याचा सोने चांदी दराच्या बाबत कोणताही परिणाम नाही. मात्र, आंतरराष्ट्रीय घडामोडींचा परिणाम म्हणून आज पुन्हा एकदा सोने चांदीच्या दरात घसरण झाल्याचं पाहायला मिळाले आहे.

गेल्या दोन दिवसात सोन्याच्या आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाल्याने सर्व सामन्यांना दिलासा मिळाला असला तरी गुंतवणूकदारांना मात्र मोठा आर्थिक फटका बसल्याचे पाहायला मिळाले आहे. आज केंद्रीय अर्थ संकल्प जाहीर करण्यात आल्याच्या नंतर त्यात सोने चांदी विषयक कराच्या बाबत नव्याने कोणतीही तरतूद करण्यात आली नसल्याने,त्याचा सोने चांदी दरावर कोणताही परिणाम होताना दिसत नसला तरी जागतिक घडामोडी पाहता,सोने चांदीच्या दरात आज पुन्हा एकदा घसरण झाल्याचं पाहायला मिळत आहे.

काल सोन्याचे दर हे जीएसटी सह १ लाख ६० हजारांवर होते. सोन्याच्या दरात आज पाच हजार रुपयांची घसरण होऊन ते १लाख ५५ हजार रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. तर, चांदीच्या दरात देखील ३० हजार रुपयांची घसरण होऊन चांदीचे दर २७०००० रुपयांच्या खाली आले आहेत. सोनाच्या आणि चांदीच्या दरात मोठी घसरण झाल्याने,सर्व सामान्य ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.

१ फेब्रुवारी २०२६ ला अर्थसंकल्पादिवशी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. स्पॉट मार्केटमध्ये चांदीचा दर २६५६०० रुपयांवर आला. चांदीच्या दरानं ४ लाख २० हजारांचा उच्चांक गाठला होता. ज्या वेगानं चांदीचे दर वाढले होते, त्याच वेगानं चांदीचे दर खाली आले. चांदीचे दर जवळपास १ लाख ३४ हजार रुपयांनी घसरले. केंद्र सरकारकडून अर्थसंकल्पात सोने आणि चांदीवरील आयात शुल्क कमी केलं जाईल अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र, सोने आणि चांदीवरील आयात शुल्क कमी करण्यात आलेलं नाही. गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीचे दर वाढत असल्यानं गुंतवणूदारांकडून सिल्वर आणि गोल्ड ईटीएफमध्ये गुंतवणूक केली जात होती. मात्र, त्यात देखील आज घसरण झाली.

## श्रमदानाला ...

संतोष काबरा यांनी केले तर सूत्रसंचालन रघुराम उखर्डे यांनी केले.

या सोहळ्याच्या सांगता समारंभासाठी जाफराबाद तालुक्यातील प्रत्येक गावातून महिलांनी आपापल्या घरून पुरणपोळी तयार करून आणली होती जवळपास दहा ट्रॅक्टर ट्रॉली भरून पुरणपोळ्या या ठिकाणी आल्या होत्या दरम्यान गौरीशंकर महादेव मंदिर गोसेवा आश्रमाच्या वतीने व भाविकांच्या दानातून तीन टन आमटी तर दोन टन गुळवणी बनवण्यात आली होती. जवळपास २५ हजार भाविकांनी यावेळी पुरणपोळीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला.

**महिलांची उपस्थिती लक्षणीय**

सात दिवसीय कार्यक्रमात महिलांकडून विविध देवी-देवतांचे पूजन कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमासाठी यावर्षी सर्वाधिक महिला उपस्थित राहिल्या सांगता समारंभातही महिलांचे योगदान व उपस्थिती लक्षणीय होती.

**श्रमदानाला महत्त्व : माधवगिरी महाराज**

जाफराबाद तालुक्यात असलेल्या गौरीशंकर महादेव मंदिर परिसरात होणाऱ्या जपानुष्ठान सोहळ्यामध्ये भाविकांचे श्रमदान महत्त्वाचे असून यामुळे नाशिकहून या ठिकाणी आल्यानंतर आपल्याला माहेरी आल्यासारखे वाटते असे प्रतिपादन परमपूज्य माधवगिरी महाराज यांनी केले. धार्मिक कार्यातून निकोप समाज घडविला जातो . सुसंस्कृत पिढी घडविण्यासाठी पंथावर ग्रंथावर आणि संतांवर निस्ता असली पाहिजे असे सांगून त्यांनी सद्गुरू जनार्दन स्वामी यांच्या कार्याचा गौरव करत जाफराबाद तालुक्याच्या भक्त मंडळाचे कौतुक केले. जीवनामध्ये जप अनुष्ठानाला अनन्यसधारण महत्त्व असून प्रत्येक बालकांनी, युवकांनी जीवनात जप अनूष्ठानात सहभागी झाले पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले.